# भुजबळ नॉलेज सिटी

# मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३

# ‘रंगनाथन दिवस’ कार्यक्रमाचा अहवाल २०१६

**<u>भारतीय ग्रंथालयाचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांची १२५ वी जयंती ग्रंथालय फोरम तर्फे उत्साहात साजरी</u>**

**तारीख :- १२ ऑगस्ट २०१६.**

**वेळ -: बुक टॉक स्पर्धा सकाळी ११ पासून सुरुवात.**

**ग्रंथ प्रदर्शन सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० पर्यन्त.**

**ठिकाण -: मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी.**

भारतीय ग्रंथालयाचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांची १२५ वी जयंती ग्रंथालय फोरम तर्फे वेगवेगळे कार्यक्रम राबवून साजरी करण्यात आली. याप्रसंगी मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये ग्रंथ प्रदर्शन भरवण्यात आले. ग्रंथ प्रदर्शन दालनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी केले.तसेच बुक टॉक या नाविन्यपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन फार्मसी च्या सेमिनार हॉलमध्ये करण्यात आले.

या कायर्क्रमप्रसंगी पद्मश्री डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेचे पूजन इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरिंगचे प्राचार्य डॉ. व्ही. पी. वाणी रजिस्ट्रार सुहास खैरनार यांनी केले. फार्मसी कॉलेज चे ग्रंथपाल नितीन भामरे डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या जीवन चरित्रा विषयी माहिती दिली.

बुक टॉक या कायर्क्रमाची सुरवात इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्नीकचे प्राचार्य विजय भट यांनी चंद्रकांत वर्तक यांच्या भ्रमण चित्रे या पुस्तकाचा सारांश सांगून केली. त्यात १३ विद्यार्थांनी वेगवेगळ्या पुस्तकांचे सारांश उत्कृष्ट शैलीत सादर केले.त्यापैकी निकिता ढोबळे (एस. वाय. बी.फार्म), पियुष इंगळे (एस. वाय. बी.फार्म), प्रदीप इंगळे (एस.वाय.एम.बी.ए.) व अभिजित बेलेकर (फायनल इयर बी.फार्म) यांनी पुस्तकांचे सारांश उत्कृष्ट सांगितल्याबद्दल त्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तसेंच त्यातून स्पेशल अवार्ड हर्षल बेळे (एस.वाय.एम.बी.ए.) या विद्यार्थाने पटकाविला. ग्रंथालय विभागामार्फत यानिमित्ताने पुस्तक परीक्षण याविषयीची स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ग्रंथालयात आलेल्या पुस्तक परीक्षणापैकी फटागले पूजा (एस.वाय.बी.फार्म.), अहिरे धीरज (एस.वाय.बी.फार्म.) आणि झगझाप रागिणी (एस.वाय.बी.फार्म.) यांनी उत्कुष्ट शैलीत पुस्तक परीक्षण सादर केले. कार्यक्रमाला ८५ विध्यार्थी व ३० शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमसाठी इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीच्या डॉ. गीतांजली देवकर, डॉ. सुनिता सुरसे यांनी परीक्षक म्हणून काम पहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्नीकच्या ग्रंथपाल अनुपमा शेजवळ आणि आभार प्रदर्शन उप ग्रंथपाल विजय रहाणे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले, तसेच कॉलेजचे विश्वस्त समीर भुजबळ आणि प्रशासिका शेफाली भुजबळ यांनी केले.

**प्राचार्य** **लायब्ररी इन चार्ज** **ग्रंथपाल**

**भुजबळ नॉलेज सिटी**

**मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, नाशिक - ४२२००३**

**<u>भारतीय ग्रंथालयाचे जनक डॉ. एस आर रंगनाथन यांची १२५ वी जयंती ग्रंथालय फोरम तर्फे साजरी</u>**



*भारतीय ग्रंथालयशास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या १२५ व्या जयंती निम्मित, त्यांची प्रतिमा पूजनासाठी ग्रंथालयात ठेवण्यात आली.*



*इन्स्टिट्यूट ऑफ पॉलीटेक्नीकचे प्राचार्य विजय भट यांनी चंद्रकांत वर्तक यांच्या भ्रमण चित्रे या पुस्तकाचा सारांश सांगितल्याबद्दल इंजिनीअरिंग चे ग्रंथपाल संभाजी पाटील यांनी प्राचार्यांचा सत्कार केला.*




बुक टॉक स्पर्धेत सहभागी विद्यार्थी, पुस्तकाचा सारांश सांगताना



कार्यक्रमाला उपस्थित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,सर्व इन्स्टिट्यूटचे ग्रंथपाल आणि विद्यार्थीवृंद.




प्रा. डॉ. हर्षवर्धन गोखले, उपस्थित शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थांना संबोधित करतांना.





बुक टॉक स्पर्धेचे परीक्षक डॉ. सुनिता सुरसे व डॉ. गीतांजली देवकर यांनी सहभागी आणि विजेत्या विदयार्थांचे कौतुक केले.





विजेत्या विद्यार्थांचा पुस्तक भेट देऊन सत्कार करतांना इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटचे प्रा. डॉ. हर्षवर्धन गोखले.